। बीड-महाराष्ट्र । बुधवार दि.२५ मार्च २०२६ । वर्ष ६ वे । अंक ०६ । पान २ । पाने ४ । किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

। RNI/MAHMAR/2021/80074 । Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 । https://marathwadapatra.com । https://epaper.marathwadapatra.com




## मनोज जरांगे पाटील यांचा समाजाला शब्द!

# धनगर बांधवांनो...कडवट व्हा, मराठा समाज तुमच्या पाठीशी







मुंबई । वृत्तसेवा

**धनगर समाजाची ताकद मोठी आहे, पण ती तुम्हाला कधी कळालीच नाही. मिळेल त्या वाहनाने मुंबईकडे निघा, घरी बसून आरक्षण मिळणार नाही. मुंबईत आले तर तुम्ही आरक्षण घेऊनच परत जाल. पण त्यासाठी आधी धनगर समाजाने कडवट झाले पाहिजे, तुम्ही ताकदीने रस्त्यावर उतरले तर सहा कोटी मराठा समाज तुमच्या मागे उभा करतो, असा शब्द मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणकर्ते दीपक बोऱ्हाडे आणि धनगर समाजाला दिला.**



धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण द्या, या मागणीसाठी आंदोलक दीपक बोऱ्हाडे यांनी मुंबईच्या आझाद मैदानात बेमुदत उपोषण सुरू केले. आज आंदोलनाचा नववा दिवस आहे. हे आंदोलन पेट घेत असतानाच मनोज जरांगे पाटील यांनी आज दीपक बोऱ्हाडे यांची भेट घेऊन धनगर आरक्षणाच्या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शवला. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी धनगर समाजाच्या नेत्यांनी पुढाकार घेऊन जातीच्या लेकराचं कल्याण करा. मान-पान बाजूला ठेवा आणि समाजासाठी पुढे या. समाजानेही नेत्यांचा ▶▶पान २ वर

## नेत्यांना पुढे करा,जातीचा प्रश्न मार्गी लावा...

धनगर समाजामध्ये अनेक मोठे नेते आहेत. शेंडगे, तायवडे, जानकर यांना बोला, आरक्षण पाहिजे असेल तर सगळ्या नेत्यांना भेटा, पाहिजे तर आंदोलन बंद करा. आळशीपण सोडा, धनगर कडवट झाला तर आरक्षण घेऊनच तुम्ही मुंबईबाहेर जाल. सहा कोटी मराठा तुमच्या मागे उभा करतो. महायुतीला निवडून आणा की महाविकास आघाडीला, पण आम्हाला आरक्षण द्या, ही भूमिका तुम्ही घेतली

# ज्वारीच्या पिकात गांजाची शेती करणाऱ्याला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## पावणे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई पोलीस स्टेशनच्या पथकाने सुशी (वडगाव) शिवारात धडक कारवाई करत ज्वारीच्या पिकात बेकायदेशीर पणे गांजाची लागवड करणाऱ्या एका ६० वर्षीय इसमाला अटक केली आहे. भाऊसाहेब तात्याबा तुरुकमारे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातुन १ लाख ७४ हजार रुपये किमतीचा ५ किलो ८०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. आर्थिक फायद्याच्या उद्देशाने स्वतःच्या शेतात अमली पदार्थाचे पीक घेतल्याप्रकरणी आरोपीवर एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक



नवनीत काँवत यांनी दिलेल्या कडक निर्देशांनुसार ही कारवाई करण्यात आली. सुशी शिवारातील गट नंबर २३४ मधील शेतात ज्वारीच्या पिकाच्या आड गांजाची झाडे लावली असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून मिळाली होती. या माहितीच्या आधारे गेवराई पोलिसांनी ▶▶पान २ वर

## अज्ञात वाहनाच्या धडकेने

# उंट जखमी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव-गेवराई या राष्ट्रीय महा मार्गावर अज्ञात चार चाकी वाहनाने रोडवर चालणाऱ्या उंटाला जोराची धडक दिल्याने उंटाचा पाय मोडला आहे शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. उंटावर लहान मुलांना बसून आपला उदरनिर्वाह करणारे टाकरवन येथील कुटुंब आहे ते दररोजच्यासारखे आपला उंट घेऊन व्यवसाय करण्यासाठी व्यवसाय करण्यासाठी दिनांक २४ मार्च रोजी सकाळी पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास माजलगाव गेवराई रोड वरून माजलगावात येत असताना कन्यादान मंगल कार्या 'लयाच्या समोर माजलगाव कडून गेवराई कडे जाणाऱ्या चार चाकी वाहनाने रोडवर ▶▶पान २ वर

## खासदार बजरंग सोनवणे यांचे आंदोलन

# कांदा उत्पादकांसाठी एल्गार

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संसद भवन परिसरात आज जोरदार आंदोलन करण्यात आले. खासदार बजरंग सोनवणे यांनी हे आंदोलन करत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. कांद्याच्या दरातील सततची घसरण आणि निर्यातीवरील निर्बंधांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्रासह देशभरातील बाजारपेठेत कांद्याचे दर कोसळल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही परत मिळत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे सोनवणे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या मांडल्या. कांद्याला कायदेशीर हमीभाव लागू करावा, निर्यातीवरील सर्व निर्बंध हटवून कांदा निर्यात पूर्णपणे मुक्त करावी आणि




साठेबाजी तसेच धोरणात्मक अनियमिततेबाबत (केंद्रीय अन्वेषण विभाग) मार्फत चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. सरकारने तात्काळ हस्तक्षेप करून निर्णय घेतला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, ▶▶पान २ वर

## जलद मदत मिळण्यासाठी

# बीड पोलिसांचे महत्त्वाचे पाऊल




बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस दलाने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अपघातग्रस्तांना शासकीय मदत आणि विमा योजनांचा लाभ जलद गतीने मिळवून देण्यासाठी महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. २४ मार्च २०२६ रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या हस्ते जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यासाठी दोन हाय-एंड ▶▶पान २ वर

# आपेगाव उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन रोहित्र कार्यान्वित

## आ.नमिता मुंदडांच्या पाठपुराव्याला यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील आपेगाव येथील ३३ केव्ही उपकेंद्रामध्ये आमदार नमिता अक्षय मुंदडा यांच्या विशेष प्रयत्नातून आणि महावितरण कंपनीकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन रोहित्र बसवण्यात आले आहे. या नवीन यंत्रणेमुळे आपेगावसह परिसरातील पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना आता उच्च दाबाने आणि प्रामुख्याने दिवसा वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वीज प्रश्नामुळे त्रस्त असलेल्या शेतकरी वर्गाला या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला असून संपूर्ण परिसरात समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. आपेगाव आणि आसपासच्या गावांमधील शेती प्रामुख्याने सिंचनावर अवलंबून आहे, मात्र जुन्या यंत्रणेवर येणाऱ्या अतिरिक्त ताणामुळे वीज पुरवठ्यात वारंवार खंड पडत होता. कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांच्या ▶▶पान २ वर



## संपादकीय

### प्रभू श्रीराम आणि रामराज्याचे ध्येय!

रामनवमीचा उत्सव दरवर्षी भारतासह जगभरात ज्या ज्या ठिकाणी हिंदू बांधव वसले आहेत त्या ठिकाणी उत्साहाने साजरा केला. पारतंत्र्याच्या जोखडातून भारतभूमीला स्वातंत्र्य मिळाले तरी भारतभूमीचे आराध्य दैवत प्रभू श्रीराम मात्र न्यायप्रक्रियेच्या बंधनात बंदिस्तच होते. श्री रामभक्तानी अविरतपणे दिलेला लढा. केलेला संघर्ष आणि प्रसंगी छातीवर गोळ्या झेलून केलेले प्राणांचे बलिदान या सर्वांच्या फलस्वरूप प्रभू श्रीराम न्यायप्रक्रियेतून मुक्त झाले आणि काही काळातच श्रीरामजन्मभूमी अयोध्येत स्वर्गातील देवतांनाही हेवा वाटावा असे भव्य दिव्य श्रीराममंदिर उभे राहिले ज्यामध्ये डोळ्यांचे पारणे फेडणारे श्रीरामल्ला विराजमान झाले. त्या मंगलदिनी श्रीरामभक्तांनी अनुभवलेला आनंद अवर्णनीय होता. श्रीराममंदिराच्या प्रांगणात बसून श्रीराममंदिर प्रतिष्ठापणा सोहळ्याचा अनुभव घेणाऱ्या प्रत्येक प्रतिष्ठितांचे डोळे त्या क्षणी पाणावले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भगवंतदर्शनाचा आणि कृतज्ञतेचा जो भाव दिसत होता त्याला कशाचीही तोड नाही. च्या भारताचा इतिहास जेव्हा केव्हा मांडला जाईल तेव्हा २२ जानेवारी २०२४ हा दिवस त्यामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. येणारी पिढी आताच्या पिढीचे गोडवे गाईल कारण आजच्या पिढीला जे भाग्य लाभले आहे, ते मागील सहा-सात पिढ्यांच्या नशीबी नव्हते. श्रीराम सर्वार्थाने आदर्श होते. त्याकाळी जेव्हा राजे आणि राजपुत्र एकाहून अधिक विवाह करत त्याकाळीही श्रीरामांनी एकपत्नीव्रत आचरले होते. पत्नीच्या हरणानंतर वानरांचे संघटन करून त्यांनी बलाढ्य अशा रावणाचा वध केला आणि सीतामातेची सुटका केली. अश्वमेध यज्ञाच्या वेळी यजमान म्हणून विधी करण्यासाठी पत्नीची आवश्यकता असताना त्यांना दुसरी पत्नी करण्याचा सल्ला दिला गेला; मात्र श्रीरामप्रभूंनी सीतामातेची प्रतिकृती बनवून तिला शेजारी ठेवले आणि यज्ञविधी पूर्ण केले. पत्नीशी एकनिष्ठ राहण्याचा आदर्श यानिमित्ताने त्यांनी जगासमोर ठेवला. आजमितीला समाजात अनैतिकता बोकाळलेली पाहायला मिळते. विवाहित असताना विवाहबाह्य संबंध ठेवले जातात. नात्याचा अडसर नको म्हणून लिव्ह इन रिलेशनशिपचा करार करण्याचे पाश्चात्यांचे स्तोम याला न्यायालयीन मान्यता मिळाल्याने भारतातही मोठ्या प्रमाणात माजू लागले आहे. देशातील सेलिब्रिटी मंडळी या कुप्रथेचे जाहीरपणे समर्थन करू लागली आहे. आजच्या तरुणांना लग्न करण्याआधी लिव्ह इनमध्ये राहण्याचा सल्ला देऊ लागली आहेत. भारतीय संस्कृतीला न शोभणाऱ्या या फॅडमध्ये आता गुन्हेगारीचा शिरकाव होऊ लागला आहे. सहकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या छळाचे, फसवणुकीचे गुन्हे नोंद होऊ लागले आहेत. एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. आईवडिलांच्या विरोधाला न जुमानता घेतलेल्या निर्णयात फसवणूक झाल्याने काही मुली आत्महत्येचा मार्ग स्वीकारत आहेत. कित्येक मुलींचे जीवन यामध्ये उध्वस्त होत आहे. शारीरिक गरजा भागवण्यासाठी अनैतिकतेला कागदी कराराचे नैतिक लेबल लावून निर्माण झालेल्या संबंधांत नात्याचा गोडवा कुठून येणार? नैतिकतेचा आदर्श प्रभू श्रीरामांनी आपल्यासमोर ठेवला आहे तो पुनर्जीवित करण्याचे दायित्व आजच्या पिढीवर आहे. वडिलांनीं सावत्र आईला दिलेल्या वचनाचा मान राखत प्रभू श्रीरामांनी १४ वर्षांचा वनवास पत्करला. एकीकडे राज्याभिषेकाची सिद्धता सुरु असताना अचानकपणे आलेला वनवास प्रभूंनी हसत हसत स्वीकारला. वनवासातून परतल्यानंतर कोणताही पूर्वग्रह मनात न बाळगता प्रभू श्रीरामांनी माता कैकयीचे पदस्पर्श करून आशीर्वाद घेतले. कुठे संपत्तीसाठी जन्मदात्या आईची हत्या करणारी आजची पिढी आणि कुठे वनवास देणाऱ्या सावत्र आईंशीही सख्ख्या आईच्या मायेने प्रेम करणारे प्रभू श्रीराम. रावणाचा वध केल्यानंतर त्याचे अंत्यसंस्कार करण्यास विभीषण तयार नव्हते, अशावेळी 'मरणांती वैराणी' या वचनानुसार प्रभू श्रीरामांनी बंधुत्वाच्या नात्याने रावणाचे अंत्यसंस्कार करण्याची तयारी दर्शवली. संकटकाळात सुग्रीव आणि विभीषणाला साहाय्य करून प्रभू श्रीरामांनी मित्रत्वाचा आदर्श जगासमोर ठेवला. प्रभू श्रीराम एकवचनी होते. मुखातून निघालेला प्रत्येक शब्द हा सत्यच असायचा. वनवासात असताना श्रीरामांनी अनेक शापित जीवांचा उद्धार करून आपले अवतारत्व सिद्ध केले होते. भगवंताच्या कृपेने आणि श्रीरामभक्तांच्या प्रयत्नांनी ५०० वर्षांनंतर श्रीरामजन्मभूमीत राम मंदिर उभे राहिले, असेच प्रयत्न सुरु ठेवले तर रामराज्यही दूर नाही. रामराज्य म्हणजेच आदर्श राज्य. जिथे समस्त जीव गुण्यागोविंदाने नांदतील. जिथे सज्जनांचे रक्षण होईल आणि दुर्जनांचे निर्दालन केले जाईल. जिथे अनाचार, अत्याचार आणि भ्रष्टाचार यांना स्थान नसेल. जगाच्या पाठीवर आजही आदर्श राज्य म्हणून रामराज्याचे उदाहरण दिले जाते. राजधर्म काय असतो, राजाचे प्रजेपती काय कर्तव्य असते हे प्रभू श्रीरामचंद्रांनी आपल्या आचरणातून जगाला दाखवून दिले आहे. देशात रामराज्य आणायचे असेल तर राजकीय मंडळींवर विश्वास ठेवून चालणार नाही. रामराज्याची स्थापना सर्वप्रथम आपल्या मनात करावी लागणार आहे. त्यासाठी मनातील दोषांचे निवारण आणि गुणांचे संवर्धन करण्याचे प्रयत्न आपल्याला करावे लागतील. 'सामर्थ्य आहे चळवळीचे जो जो करील तयाचे परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे' या समर्थांच्या वचनानुसार सामाजिक स्तरावर कार्य करताना प्रत्येक वेळी भगवंताचे अधिष्ठान असणे गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या सोळाव्या वर्षी रोहिडेश्वराला साक्षी ठेवून हिंदवी स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. साक्षात आई भवानीचे त्यांना आशीर्वाद होते. समर्थ रामदासस्वामी आणि संत तुकारामांसारख्या महान संतांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. महाराजांच्या मुखात सदैव जगदंब जगदंब हा जप असे. आई भवानीची कृपा आणि स्वराज्यनिष्ठ मावळ्यांची साथ यांच्या बळावर शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. नामस्मरणाचा महिमा अगाध आहे. नामस्मरणाने मनाची शुद्धी होते, सत्संगाने नामस्मरणाला चालना मिळते. अंतर्बाह्य शुद्धी होऊन अंतःकरणात रामराज्य आले कि समाजात रामराज्य स्थापन होण्यास वेळ लागणार नाही. सर्वांनी संघटितपणे प्रयत्न केले तर असाध्य असे काहीच नाही. कधीकाळी असाध्य वाटणारे श्रीराम मंदिराचे ध्येय आज पूर्ण झाले. भारतभूमीमध्ये रामराज्याची पहाटही लवकरच पाहायला मिळावी यासाठी श्रीरामनवमीच्या पावनदिनी प्रभू श्रीरामचंद्राच्या चरणी शरणागत भावाने प्रार्थना करूया !

## आकर्षक पॅकेजसह करिअरला नवी दिशा

# कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये आदित्य शिक्षण संस्थेच्या १४ विद्यार्थ्यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**



दयानंद सिरसाट, बावणे वैभव, अनंता वासू, लांडे आकाश, अमेय गावंडे, हर्षवर्धन शेळके, सचिन राठोड, सुशांत मुंडे, सुनील मदने, तनपुरे संग्राम, लाटे तेजस, रेहान सगीर सय्यद, सचिन धुमाळ, सौरभ जानकर

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्थेने कॅम्पस इंटरव्ह्यूत पुन्हा एकदा यशाचा मानाचा तुरा रोवला आहे. ६० विद्यार्थ्यांमधून १४ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड होऊन संस्थेच्या गुणवत्ता व मार्गदर्शनाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. आदित्य कृषी व कृषी जैवतंत्रज्ञान शाखेत १८ मार्च रोजी आयोजित कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये वडोदरा येथील झायडेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि. या नामांकित कंपनीने १४ विद्यार्थ्यांची निवड केली. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेमध्ये सातत्याने विविध उपक्रम राबवले जात आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोठा लाभ मिळत आहे. शिक्षणाबरोबर त्यांच्या करिअरसाठी आदित्य शिक्षण संस्था सतत उपक्रमशील असते. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये आदित्य कृषी शाखेतील १२ विद्यार्थी हर्षवर्धन शेळके,सुशांत मुंडे,अमेय गावंडे, सुनील मदने,सचिन धुमाळ, तेजस लाटे,संग्राम तनपुरे,दयानंद शिरसाट, आकाश लांडे,वैभव भावने, अनंता वासू,रेहान सय्यद व आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान शाखेतील दोन विद्यार्थी सचिन राठोड आणि सौरभ जानकर , असे एकूण १४ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या यशामुळे संपूर्ण संस्थेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी शाखेचे प्राचार्य शामजी भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान शाखेचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे, तसेच प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रिया गव्हाणे यांनी केले. यावेळी शाखेतील प्राध्यापक व शिक्षकांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थी काय म्हणतात...

आदित्य कृषी महाविद्यालयात शिकताना मला केवळ पुस्तकातील ज्ञानच नाही, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभवही मिळाला. प्रॅक्टिकल ट्रेनिंग आणि नियमित मार्गदर्शनामुळे माझा आत्मविश्वास खूप वाढला. कॅम्पस ड्राईव्हमध्ये सहभागी होताना भीती वाटत होती, पण शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनामुळे मी इंटरव्ह्यू आत्मविश्वासाने दिला. झेडस कंपनीत माझी निवड होणे हा माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. या यशामागे महाविद्यालय आणि शिक्षकांचे मोठे योगदान आहे.

**-दयानंद सिरसाट, विद्यार्थी**

## प्रॅक्टिकल नॉलेजमुळे उद्योग क्षेत्रातील अपेक्षा समजल्या

आदित्य कृषी महाविद्यालयाने आम्हाला करिअरच्या दृष्टीने योग्य दिशा दिली. येथे मिळालेल्या प्रॅक्टिकल नॉलेजमुळे उद्योग क्षेत्रातील अपेक्षा समजल्या. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या वेळी शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन खूप उपयोगी पडले. त्यामुळे मी आत्मविश्वासाने सर्व प्रक्रिया पूर्ण केली. चांगल्या कंपनीत नोकरी मिळणे हे माझे स्वप्न होते, जे महाविद्यालयामुळे पूर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी येथे खूप चांगले वातावरण आहे.

**-वैभव बावणे, विद्यार्थी**

## पान १ वरून

### धनगर बांधवांनो...

योग्य मान, सन्मान राखला पाहिजे, असे आवाहनही मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केली. गोरगरिब धनगर बांधवांना आरक्षण मिळावे म्हणून दीपक बोऱ्हाडेंचे आमरण उपोषण सुरू आहे. आम्ही ताकदीने तुमच्यासोबत आहोत. समाजाच्या लोकांना कधी विनंती करायची नसते, आमच्या भावना समजून घ्यायच्या असतील तर समजून घ्या, आम्ही प्रामाणिक प्रयत्न करतो. एकाही धनगराने घरी थाबंल नाही पाहिजे, त्याशिवाय न्याय मिळणं शक्य नाही. आपल्याकडे काही कमी नाही, येण्यासाठी. स्वतःच्या जातीचे लेकरंबाळं मोठं करायचे असतील तर झोकून देवून काम करावे लागते. मी आल्यामुळे पुन्हा सुरू झालं, दोघाच्या पोरांनी ऊस तोडायला जायचं का? माझा समाज यातून बाहेर पडला, धनगरांनी यातून बाहेर पडा. काड्या लावणारे, खेळ पांगवणारे आम्ही दूर केले. चौंडीच्या आंदोलनापासून मी सांगीतलं की, आमचा तुमच्या आरक्षणाला पाठिंबा आहे. तुम्ही मिळेल त्या साधनाने मुंबईला या आरक्षण मिळाल्याशिवाय राहणार नाही. नेत्यांना एक करा, उपोषण सोडायची वेळ आली तरी चालेल नेतृत्व त्यांना करू द्या. मी नेता नाही, मराठा आंदोलक आहे. तुमच्याकडे चांगले नेते आहेत. जातीचं कल्याण करायचं असेल तर पडा त्यांच्या पाया, राजकारण आवश्य करा, पण जात म्हटलं की एक या, मी ते केलं आता ताकदीने समाज आमच्या मागे उभे आहे, असे जरांगे पाटील म्हणाले.

### नेत्यांना पुढे करा...

पाहिजे. आम्ही दोन टप्प्यात वागणार नाही. धनगराची माऊली मेंढ्या मागे उन्हा-तान्हात पाय जाळती. तुम्हाला ताई-माऊलीची वेदना, कळकळ असेल तर धनगर घरी बसणार नाही, मुंबईत येईल. आधी जात मग नेता हे ठरवा. सगळ्या नेत्यांना पुढे करा, जातीचा प्रश्न मार्गी लावला तर आम्ही तुमचेच, तोपर्यंत नाही हे सांगा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले.

### आपेगाव उपकेंद्रात...

शेतीपंपांचे नुकसान होण्याचे प्रमाणही वाढले होते. ही समस्या लक्षात घेऊन आमदार नमिता मुंदडा यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे या उपकेंद्राची क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यांच्या या मागणीची दखल घेत प्रशासनाने नवीन रोहित्र बसवण्यास मंजुरी दिली आणि त्याचे काम आता पूर्ण झाले आहे. या नवीन ५ एमव्हीए क्षमतेच्या रोहित्रामुळे विद्युत पुरवठ्यातील तांत्रिक अडचणी दूर झाल्या असून आता पूर्ण दाबाने वीज मिळणार आहे. विशेष म्हणजे शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जावे लागू नये यासाठी दिवसा वीज उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे जंगली प्राण्यांचा धोका आणि रात्रीच्या वेळी होणारी गैरसोय टळणार आहे. आ. नमिता मुंदडा यांच्या कार्यतत्पतेबद्दल शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री पंकजाताई मुंडे आणि राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

### ज्वारीच्या पिकात...

कायदेशीर पूर्तता करून कृषी व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांसह प्रत्यक्ष घटनास्थळी धाड टाकली. या शोध मोहिमेदरम्यान शेतात गांजाची एकूण ४२ झाडे आढळून आली, जी पोलिसांनी तात्काळ जप्त केली. ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि लंके, सपोनि जंजाळ व त्यांच्या पथकाने पार पाडली. यामध्ये फॉरेन्सिक पथकासह कृषी व महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांचाही समावेश होता. सध्या पोलिसांनी आरोपीला अटक केली असून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

### कांदा उत्पादकांसाठी...

असा इशारा खासदार सोनवणे यांनी दिला. दरम्यान, संसद परिसरातील या आंदोलनामुळे कांदा उत्पादकांचा प्रश्न पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला असून, केंद्र सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### उंट जखमी...

चालणाऱ्या उंटाला पायाला धडक देऊन सदर चार चाकी वाहन धारक फरार झाला आहे या अपघातामध्ये उंटाच्या मागील उजव्या पायाला जबर मार लागल्याने त्या उंटाचा पाय मोडला आहे सदर उंट गंभीर जखमी झाला असून शेअर पोलीस ठाण्यामध्ये अज्ञात वाहनाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे सदर उंटावर परभणी येथील रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल केले आहे.

### बीड पोलिसांचे...

टॅब्सचे वितरण करण्यात आले. या आधुनिक उपकरणांमुळे अपघाताची माहिती आता घटनास्थळावरूनच थेट शासन प्रणालीत नोंदवता येणार आहे. रस्ते अपघातातील जखमी आणि मृतांच्या कुटुंबांना 'प्रधानमंत्री राहत निधी' तसेच इतर विमा योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी अपघाताची अचूक नोंद होणे आवश्यक असते. यासाठी केंद्र शासनाच्या 'आयआरएडी' (खठ-ऊ) आणि 'ई-डीएआर' (श-ऊ-ठ) या प्रणालींमध्ये माहिती भरणे गरजेचे आहे. नवीन टॅब्सच्या वापरामुळे ही माहिती अधिक पारदर्शक आणि जलद गतीने भरली जाईल, ज्यामुळे नागरिकांचे विमा दावे मंजूर होण्यास मोठी मदत होणार आहे. टॅब्स वितरण कार्यक्रमावेळी अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी उपस्थित होते. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक स्मार्ट आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी बीड पोलीस कटिबद्ध असल्याचे यावेळी पोलीस अधीक्षकांनी आवर्जून सांगितले.

## एसपी साहेब...

### असल्या नराधमाची चांबडे सोलून वेशीवर लटकवा

जिल्ह्यात नुकतीच एक हृदय द्रावक घटना घडलेली आहे. एका सहा वर्षाच्या निष्पाप चिमुकलीवर एक वासनांध युवकाने आपली लैंगिक भूक भागवण्याच्या अक्षम्य अपराध केला आहे.काळजाला पीळ पाडणारी आणि मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेमुळे अख्खा बीड जिल्हा सुन्न झाला आहे. मनात लाव्ह्यासारखी आग आणि डोक्यात प्रचंड राग आहे. कल्पनाही करवत नाही या असल्या गोष्टीची. या नराधमाची चांबडी सोलून वेशीवर लटकवली पाहिजेत. बीड जिल्ह्यातील या अमानवीय घटनेची दखल घेत पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून पुढील तपास सुरू आहे. ही तपासाची प्रक्रिया सुरू राहील. आरोप सिद्ध होतील की कायद्याच्या कचाटयात केस अडकून राहील हे येणारी वेळच ठरवील. पण त्या चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराचे काय? तिच्यावर शारीरिक आणि मानसिक आघाताचे काय? त्या कुटुंबावर आलेल्या अस्मानी संकटाला सामोरे जावे कसे? या हानीची कशी भरपाई होणार आहे? याबाबत कायद्या त कोणत्या तरतुदी आहेत? ही प्रश्ने कायम अनुत्तरित राहणार आहेत. खरंतर या सारख्या गुन्ह्यात अपराध सिद्ध होताच सरळ सरळ कडेलोट केला पाहिजे. चांबडी सोलली पाहिजेत.नाहीतर पुरुषत्वाचा अभिमान बाळगता येऊ नये म्हणून सरळ सरळ लिंग छाटले पाहिजे जेणे करुन भविष्यात असले अपराध होणारच नाहीत. या गुन्ह्यात आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. प्रचलित कायदा पोक्सो ीींशिलींळेप`ष लहळश्रवीशप षीा िर्शिींरश्र`षषशपलश रलीं २०१२असून या कायद्याने त्या चिमुकली ला आणि कुटुंबाला खरंच न्याय मिळेल का. या कायद्याअंतर्गत आरोप सिद्ध झाल्यानंतर गुन्ह्याच्या प्रमाणावर ७ ते १० वर्ष,२० वर्ष वा मृत्युदंडापर्यंतच्या शिक्षा आहेत. पुरावे देण्याची जबाबदारी ही संबंधित गुन्हेगारावर असून यामध्ये पीडित बालकावर पूर्ण विश्वास टाकण्यात आला असून ती निष्पाप असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर न्याय निवाडा हा चाइल्ड फ्रेंडली अशा वातावरणामध्ये पार पडतो. खरंतर बाल कल्याण समिती अशा प्रकरणी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते . या समितीमार्फत संबंधित बालिका बालक व कुटुंब यांच्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यात येते. कायद्यातील या तरतुदी त्या लहान कळी ला न्याय देतील का आणि त्या नराधमाला फासावर लटकावतील का?या न्यायाची वाट संपूर्ण बीड जिल्हा पाहत आहे.

**-सी.ए.नखाते**




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com